महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
विभागीय मंडळ, पुणे.४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - |
|---|---|---|
| 25536722 (OFFICE) | 25536781/82/83, 25536712 (OFFICE) | sscboardpune@gmail.com |


क्रमांक: पुविंम/शाखा/डीपी/ 445
पुणे :- ४११ ००५
दिनांक :- 19/01/2026

प्रति,
सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य
शाळा / कनिष्ठ महाविद्यालय
जिल्हा पुणे, अहिल्यानगर व सोलापूर

**विषय :-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२६ शिक्षासूची वाचनाबाबत...

संदर्भ :- क्र.रा.मं/परीक्षा-८/४६१६ दि. ०१.०१.२०२६ राजीचे राज्यमंडळाचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) दि. १०/०२/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) दि. २०/०२/२०२६ ते १८/०३/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे आणि परीक्षेशी संबंधित घटकांच्या वैचारिक मनोवृत्तीमुळे परीक्षेत विविध मार्गांनी निष्पन्न होणाऱ्या गैरप्रकारांचा मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो. त्यादृष्टीने मंडळामार्फत विविध उपाययोजना आणि उपक्रम राबविले जातात. याच धर्तीवर विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करु नये यासाठी गैरप्रकारामुळे विद्यार्थ्यांना मंडळाच्या शिक्षासूचीनुसार होणारी कार्यवाही अवगत करणे आवश्यक आहे.

यासाठी विद्यार्थ्यांसाठी असणारी शिक्षासूची वाचन शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसमोर परीक्षेपुर्वी करावे. शक्य असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यास त्याची प्रत देण्यात यावी. सदर कार्यवाही केल्याबाबत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेवून सदरचा दस्ताऐवज शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी दप्तरी ठेवण्यात यावा. तसेच याबाबतचे प्रमाणपत्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाच्या ईमेल वर पाठवावे. विद्यार्थ्यांसाठी शिक्षासूची, उत्तरपत्रिकच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूच्या सूचना व शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर करावयाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

MBRaut
( डॉ.मिनाक्षी राऊत )
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.